अपराधी परिविक्षा अधिनियम, १९५८ अंतर्गत मुक्तबंदी/ परिविक्षाधीन यांच्या पुनर्वसनार्थ द्यावयाच्या आर्थिक सहायक अनुदानामध्ये वाढ करुन या योजनेमध्ये निर्दोष मुक्त झालेल्या बंद्यांचा समावेश करण्याबाबत

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग
शासन निर्णय क्र. अपअ-२०२२/प्र.क्र.४३/का-९
नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक- १८/०८/२०२६

वाचा-

१.शासन निर्णय गृह विभाग क्र.पीओए-९५८६/१(१४१)/पीआरएस-२, दि.०२/१/१९९३
२. शासन निर्णय महिला व बालविकास विभाग क्र. अपअ-२००१/प्र.क्र.२००/का-८, दि.०२/०९/२००२
३. शासन निर्णय महिला व बालविकास विभाग क्र. अपअ-२०११/प्र.क्र.१४२/का-९, दि.१४/१०/२०१६
४. गृह विभागाचे पत्र क्र. जेएलएम-१०२१/प्र.क्र.१३८/तुरुंग-२, दि. २५/०४/२०२२, दि.०३/०३/२०२३
५. शासन निर्णय महिला व बालविकास विभाग क्र. अपअ-२०२२/प्र.क्र.४३/का-९, दि.०५/१२/२०२४
६. शासन निर्णय महिला व बालविकास विभाग क्र. अपअ-२०२२/प्र.क्र.४३/का-९, दि.०४/०८/२०२५

प्रस्तावना -

केंद्र शासनाचा १९५८ चा अधिनियम व महाराष्ट्र अपराधी परिविक्षा अधिनियम, १९५८ अंतर्गत मुक्त बंदी /परिविक्षाधीन यांच्या पुनर्वसनासाठी संदर्भ क्र. ३ येथील शासन निर्णयान्वये रु. २५,०००/- पर्यंत सहायक अनुदान आर्थिक स्वरुपात दिले जाते.

मा. उच्च न्यायालयाने सुमोटो क्रिमिनल रिट पिटीशन क्र.८/१९९४ आणि ११०३/९४ मध्ये दिलेल्या निर्देशानुसार प्रधान सचिव व विधी परामर्शी (विधी व न्याय विभाग) यांच्या अध्यक्षतेखाली विधी व न्याय विभागाने दि. ३०/६/१९९६ च्या शासन निर्णयान्वये आंतर विभागीय समिती गठीत केली आहे. सदर समितीच्या वेळोवळी होणाऱ्या बैठकांमध्ये देण्यात येणाऱ्या निर्देशाच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येते. समितीच्या दि. २८/०८/२०२३रोजीच्या बैठकीमध्ये सदर योजनेमध्ये निर्दोष सुटलेल्या परंतु दिर्घकाळ कैदेत राहिलेल्या बंद्यांचा समावेश करण्याबाबत निर्देश देण्यात आले होते.

सदर योजनेमध्ये निर्दोष सुटलेल्या परंतु किमान १ वर्षे कैदेत राहिलेल्या बंद्यांचा समावेश करण्याचे तसेच मुक्त बंदी व परिविक्षाधीन अपराधी यांना देण्यात येणाऱ्या सहायक अनुदानात वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

महिला व बाल विकास विभागांतर्गत "अपराधी परिविक्षा अधिनियम,१९५८ अंतर्गत मुक्त बंदी /परिविक्षाधीन बंद्यांच्या पुनर्वसनासाठी आर्थिक मदत म्हणून देण्यात येणाऱ्या सहायक अनुदानाची रक्कम रु.२५,०००/- वरुन वाढवून रु.५०,०००/- करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे. तसेच या योजनेमध्ये निर्दोष मुक्त झालेल्या परंतु किमान १ वर्षे कैदेत राहिलेल्या बंद्यांचा समावेश करण्यात येत असून त्यांना देखील मुक्त बंदी /परिविक्षाधीन बंद्यांप्रमाणे रु.५०,०००/- एवढे सहायक अनुदान अनुज्ञेय असेल.

२. या योजनेअंतर्गत मुक्तबंदीं, परिविक्षाधीन बंदी तसेच निर्दोष मुक्त झालेल्या परंतु किमान १ वर्षे कैदेत राहिलेल्या बंद्यांना आर्थिक सहाय्य मिळण्यासाठीची पात्रता/अटी व शर्ती आणि निकष संदर्भ क्र. ५ व ६ येथील शासन निर्णयाप्रमाणे राहतील. अनुदानात करण्यात येणारी वाढ या शासन निर्णयाच्या दिनांकापासून मुक्त होणाऱ्या मुक्तबंदी,परिविक्षाधीन व निर्दोष मुक्त झालेल्या बंद्यांना अनुज्ञेय असेल. सदर योजनेचा दर तीन वर्षांनी आयुक्त, महिला व बालविकास आयुक्तालय, पुणे यांच्या स्तरावर आढावा घेण्यात येईल.

३. सदर शासन निर्णय मा. मंत्रीमंडळाच्या दि.१४/०७/२०२६ रोजीच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर योजनेसाठी येणारा खर्च मागणी क्र.एक्स-१, २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण, १०६ सुधार सेवा, (०१) अपराधी परिवीक्षा योजना, (०१)(०१) अपराधी परिवीक्षा योजना (कार्यक्रम) (२२३५-०११३) या लेखाशिर्षाअंतर्गत उपलब्ध तरतूदीतून भागविण्यात येईल.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक 202608181139587430 असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

PRASAD VINAYAKRAO KULKARNI

Digitally signed by PRASAD VINAYAKRAO KULKARNI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=WOMEN AND CHILD DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=83b8be9eb843dd6eccbd6aa4f9eecd0b5f7aca67ff32b2eef7b9ed2d85ab9442, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=7D19730DDF785210D50C28934B75E9B7B4F5D06B6181CF1901CE3E48EC9E3985, cn=PRASAD VINAYAKRAO KULKARNI
Date: 2026.08.18 12:24:43 +05'30'

(प्र.वि.कुलकर्णी)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत-

१. मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव,
२. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव
३. मा. उपमुख्यमंत्री (नगरविकास) महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव
४. मा. उपमुख्यमंत्री (अल्पसंख्यांक) महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव
५. मा. अ.मु.स.(वित्त), मंत्रालय, मुंबई
६. मा. प्रधान सचिव (विधी व परामर्शी) विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई

७. मा. प्रधान सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
८. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१ / २, मुंबई / नागपूर.
९. महालेखापाल (लेखा परिक्षा), महाराष्ट्र-१ / २, मुंबई / नागपूर.
१०. आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
११. परिविक्षा अधिक्षक, महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१२. सर्व परिविक्षा अधिकारी, जिल्हा मध्यवर्ती व इतर कारागृहे यांना परिविक्षा अधिक्षक, यांचेमार्फत रवाना.
१३. निवड नस्ती (का-९)